MHAU030049732023

दाखल दिनांक : ३१.०३.२०२३

नोंदणी दिनांक : ०१.०४.२०२३

निकाल दिनांक : ०७.०३.२०२४

कालावधी ०० व.११ म. ०७ दि.

**औरंगाबाद येथील १५ वे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी–** (पिठासीन अधिकारी पी. एस. मुळे)

(घोषीत दिनांक.०७.०३.२०२४)

**नियमीत फौजदारी खटला क्र.८४८/२०२३ , निशाणी क्रं.**

**गु.र.नं.४५१/२०२२ पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद.**

| | |
|---|---|
| फिर्यादी | सरकार |
| अभियांग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. एस. एम. जोंधळे, |
| आरोपी | १. अन्वर शफियोद्दीन सय्यद,<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय – ठेकेदार,<br><br>२. रेहाना बेगम शफियोद्दीन सय्यद,<br>वय –६५ वर्षे, व्यवसाय – घरकाम, |

P 7.3.2024

| | |
|---|---|
| | ३. सय्यद एजाज शफियोद्दीन सय्यद,<br>वय – ४४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>आरोपी क्र.१ ते ३ राहणार – प्लॉट नं.५, एकतानगर सोसायटी, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.<br><br>४. समीना अनिस शेख,<br>वय – ४६ वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br><br>५. शेख अनिस शेख मुसा ,<br>वय – ४९ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>आरोपी क्र.४ व ५ राहणार – बारी कॉलनी, ग.नं.७, रोशन गेट, औरंगाबाद.<br><br>६. तहमीना बेग असिफ बेग,<br>वय – ३८ वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br>राहणार – प्लॉट नं.१०, गट नं.९५, अन्सार कॉलनी, पडेगाव, औरंगाबाद.<br><br>७. शबाना बानो शेख ,<br>वय – ४०, व्यवसाय – घरकाम,<br>राहणार – घर नं.११, गुलमोहर कॉलनी, चिनार गार्डन, पडेगाव, औरंगाबाद. |
| आरोपी क्र.१ ते ७ तर्फे विधीज्ञ | श्री. एम.आर.खान आणि झेड.ए.झैदी |

8
7.3.2024

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०६.०७.२०१९ ते ३०.०३.२०२२ |
| पहिली खबर दिनांक | १३.०७.२०२२ |
| दोषारोपत्राचा दिनांक | २३.०३.२०२४ |
| दोषारोपत्र ठेवल्याचा दिनांक | ०४.०३.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४.०३.२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७.०३.२०२४ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

R 7.3.2024

**आरोपीचा तपशील**

| आरोपीचे श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अन्वर शफियोद्दीन सय्यद, | – | सर्व आरोपींचा दिनांक ०९.०१.२०२३ रोजी न्यायालयात हजर राहण्याची नोटीस दिली. | ४९८–अ, ४०६, ३२३, ५०४ सहकलम ३४ भा.दं.वि., १८६० व सहकलम ३ व ४ हुंडाबंदी अधिनियम | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २. | रेहाना बेगम शफियोद्दीन सय्यद, | | | | | | |
| ३. | सय्यद एजाज शफियोद्दीन सय्यद, | | | | | | |
| ४. | समीना अनिस शेख | | | | | | |
| ५. | शेख अनिस शेख मुसा | | | | | | |
| ६. | तहमीना बेग असिफ बेग | | | | | | |
| ७. | शबाना बानो शेख इम्रान | | | | | | |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | हिना कौसर अन्वर सय्यद | फिर्यादी |
| २. | शेख मोईनोद्दीन शेख आमिन | साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

7.3.2024

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | नि.क्र.२७ | फिर्यादवरील सही |
| २ | नि.क्र.२८ | प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## – न्यायनिर्णय –

( घोषित दिनांक ०७.०३.२०२४ )

7.3.2024

आरोपी विरुध्द कलम ४९८–अ, ४०६, ३२३, ५०४ सहकलम ३४ भारतीय दंडविधान संहीता (या पुढे भा.दं.वी. असे संबोधले जाईल) अन्वये दोषसिध्दीसाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथनः**

२. फिर्यादी हिना कौसर यांनी दिनांक १३.०७.२०२२ रोजी देवगाव रंगारी

पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली की, तिचा विवाह ०६.०४.२०१९ रोजी आरोपी क्र.१ सोबत मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे झालेला आहे. लग्नानंतर तिला दोन ते तीन महिने चांगले नांदविले. त्यानंतर आरोपी तिला शिवीगाळ करुन मानसिक छळ करुन मारहाण करीत असे. आरोपी क्र.१ हा तिच्या आई–वडील व नातेवाईकांबाबत बोलुन हिन वागणुक देते असे. सदरची बाब तिने तिच्या आई–वडीलांना सांगितले त्यावेळी तिचे आई–वडील, तिचा भाऊ व वसिम शेख असे तिच्या सासरी आले. सदर ठिकाणी त्यांची व आरोपींची बैठक झाली, त्यावेळी, आरोपी तिला चांगले वागवतिल त्रास देणार नाही असे सांगितले. म्हणुन ती सासरी राहिली. त्यानंतर, पुन्हा, आरोपी क्र.१ याने मेडीकल टाकण्यासाठी वडिलांकडुन पैसे घेऊन ये अशी मागणी केली व त्यावरुन तिचा मानसिक व शारिरीक छळ करु लागले. म्हणुन तिने दिनांक ३०.०९.२०१९ रोजी छावणी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. त्यानंतरही ती तिच्या सासरी राहत होती. परंतु, आरोपी तिला जास्त त्रास देऊ लागले व तिच्या वडीलांकडुन रक्कम रुपये ३०,००,०००/– मेडीकल सुरु करण्याकरीता घेऊन ये अशी मागणी करु लागले. सदर कारणावरुन आरोपी तिला लाथाबुक्यांनी मारहाण करत. जोपर्यंत पैसे आणत नाही तोपर्यंत घरात येऊ नको, असे म्हणुन तिला आरोपींनी घराबाहेर काढुन दिले. आरोपी क्र.१ हा तिला उठबश्या मारण्यास सांगत असे, तसेच, त्याचे पाय धुवुन पाणी पिण्यास देत असे. सदर वागणुकीमुळे तिचा तीन ते चार महिण्याचा गर्भपात झाला. दिनांक ३०.०३.२०२२ रोजी तिच्या अंगावरील

P
7.3.2024

सोन्याचे दागिने, राणी हार, पोत, कानातले, गडसर व नेकलेस असे सहा ते सात तोळयाचे सोन्याचे दागिने काढुन घेतले व तिला घराबाहेर काढुन दिले. तिचे आई-वडीलांनी पुन्हा आरोपींची समजुत घातल्याने ती पुन्हा नांदण्यास जात असे. आरोपी क्र.१ याने तीन वेळा तलाक, तलाक, तलाक असे म्हटले आहे. सदरची फिर्याद देवगारी रंगारी पोलीस स्टेशन येथुन छावणी पोलीस स्टेशन येथे वर्ग करण्यात आली आहे.

३. उपरोक्त तक्रारवरुन छावणी पोलीस ठाणे येथील अंमलदार यांनी प्रथम गुन्हा रजि.नं.I-४५१/२०२२ कलम ४९८-अ, ४०६, ३२३, व ५०४ सह कलम ३४ भा.दं.वी. व कलम ३ व ४ हुंडाबंधी अधिनियम प्रमाणे आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. तपासिक अधिकारी यांनी साक्षिदारांचे जाबजबाब नोंदविले. आरोपींना अटक केली. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने कलम ४९८-अ, ४०६, ३२३, व ५०४ सह कलम ३४ भा.दं.वी. व कलम ३ व ४ हुंडाबंधी अधिनियम अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

7.3.2024

४. मी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ४०६, ३२३, व ५०४ सह कलम ३४ भा.दं.वी. प्रमाणे नि.क्र.१३ दोषारोप निश्चित केले. ते त्यांना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितले. आरोपींनी आरोप नाकारत खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. म्हणुन सदरचा खटला पुढे चालविण्यात आला.

५. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये आपसात समझोता झाल्याने निशाणी २५ वर तडजोड पुरशीस दाखल केलेली आहे. अभियोग पक्षाने फिर्यादी व दोन साक्षिदारास तपासले आहे. परंतु आरोपींविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जवाब नोंदविण्यात आला नाही. सरकारी वकील व आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६. अभियोग पक्षाचे म्हणणे व पुरावा यावरुन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष माझे विश्लेषणासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०६.०७.२०१९ ते ३०.०३.२०२२ दरम्यान आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीचा पती या नात्याने व आरोपी क्र.२ व ७ यांनी फिर्यादीचे पतीचे नातेवाईक या नात्याने तिच्याकडे तीस लाख रुपये आरोपी क्र.१ यास मेडीकलचे दुकान चालू करण्यासाठी माहेरून आणण्याची मागणी करून फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व तिला क्रुरपणे वागणुक दिली व त्यायोगे त्यांनी भा.द.वि. कलम ४९८-अ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस तिच्या वडीलांनी लग्नात दिलेले सोन्याचे दागिने काढुन घेतले व गैरवापर केला व त्यायोगे | |

8
7.3.2024

| | | |
|---|---|---|
| | त्यांनी भा.द.वी. कलम ४०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | |
| ३. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस हाताचापटयाने इच्छापुर्वक मारहाण केली व त्यायोगे त्याने भा.द.वी. कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली त्यायोगे त्यांनी भा.द.वि. कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आदेश काय ? आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## **का र ण मीं मा सा**

७. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ हिना कौसर अन्वर सय्यद हिची साक्ष निशाणी २६ वर नोंदवली आहे. तसेच साक्षीदार क्र.२ शेख मोईनोद्दीन शेख आमिन यांची साक्ष निशाणी २९ वर नोंदविली आहे.

8
7.3.2024

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता:**

८. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती

टाळण्याकरीता एकत्र चर्चेस घेत आहे. आरोपींनी आपसांत संगनमत करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीचा पती या नात्याने व आरोपी क्र.२ व ७ यांनी फिर्यादीचे पतीचे नातेवाईक या नात्याने फिर्यादीकडे तीस लाख रुपये आरोपी क्र.१ यास मेडीकलचा सुरु करण्यासाठी माहेरून आणण्याची मागणी करून फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व तिला क्रुरपणे वागणुक दिली. तसेच, तिला शिवीगाळ व मारहाण केली, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, वरील कलमांचे प्रमुख घटक आरोपीविरुध्द सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. त्याकरीता अभियोग पक्षाने दोन साक्षिदारास तपासलेले आहे.

९. साक्षिदार क्र.१ फिर्यादी हिने तीच्या पुराव्यात असे सांगितले की,आरोपी क्रमांक १ हा तिचा पती होता. आरोपी क्र.२ हि सासू, आरोपी क्र.३ दीर, आरोपी क्र.४ नणंद, आरोपी क्र.५ नदोई, आरोपी क्र.६ व ७ नणंदा आहेत. तिचा विवाह दिनांक ०६.०४.२०१९ रोजी आरोपी क्र.१ सोबत मुस्लीम धर्माप्रमाणे झाला होता. फिर्यादी लग्नानंतर आरोपी क्र.१ सोबत नांदण्यास गेली. लग्नानंतर चार ते पाच महिने त्यांनी तिला चांगले नांदविले. त्यानंतर तिच्यामध्ये व आरोपी क्र.१ मध्ये किरकोळ कारणांवरून वाद होऊ लागले. सदर वादामुळे तिने महिला तक्रार निवारण केंद्र औरंगाबाद या ठिकाणी आरोपींविरुद्ध तक्रार दिली होती व त्यानंतर छावणी पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दिली. परंतु, फियादीने फिर्यादीमधील मजकुर तिला माहीत नाही असे सांगितले.

R
7.3.2024

१०. सदर साक्षीदाराने सरकारपक्षास साथ दिली नाही. सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेतला. त्यामध्ये तिने सरकारी वकिलांचे सुचक प्रश्न नाकारले. साक्षीदाराने उलटतपासात सांगितले आहे की, त्यांच्यामध्ये आजरोज कोटाबाहेर तडजोड झालेली आहे. आजरोजी त्यांची आरोपींविरुध्द तक्रार नाही. त्यांचा व आरोपी क्र.१ चा घटस्फोट झालेला आहे. त्यामुळे त्यांना सदरची केस चालवायची नाही. सदर केस मागे घेण्यासाठी त्यांना कोणीही जबरदस्ती केलेली नाही. तिने स्वइच्छने तडजोड पत्रावर व पुरशिस वर सही केली आहे. आणखी साक्षीदार घ्यायचे नाही.

११. सदर साक्षीदार क्र.२ हे फिर्यादीचे वडील आहे. त्यांचे पुरव्यात असे आले आहे की, आरोपी क्र.१ याचे त्यांच्या मुलीसोबत दिनांक ०६.०४.२०१९ रोजी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे देवगाव रंगारी येथे लग्न झालेले होते. लग्नानंतर ती तिच्या सासरी औरंगाबाद येथे नांदण्यास आली होती. आरोपींनी तिला पाच ते सहा महिने चांगले नांदविले. त्यानंतर, आरोपी क्र.१ व तिच्यामध्ये किरकोळ कारणामधुन वाद होत असे. त्यामुळे, त्यांच्या मुलीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. परंतु, त्यांना त्यांच्या जबाबातील भाग वाचुन दाखवण्यात आला. तो त्यांच्या जबाबामध्ये का लिहिलेला नाही याचे कारण त्यांना सांगता येणार नाही.

8
7.3.2024

१२. सदर साक्षीदाराने सरकार पक्षास पुरक साक्ष दिली नाही. सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेतला. त्यामध्ये त्यांनी सरकारी वकिलांचे सुचक प्रश्न नाकारले. सदर साक्षीदाराने उलटतपासात सांगितले आहे की, आजरोजी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे. आजरोजी त्यांची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही तसेच फिर्यादी व आरोपी क्र.१ चा खुला झालेला आहे.

१३. वरील दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्याचे विवेचन करता असे दिसुन येते की, फिर्यादी हिने फिर्याद मधील मजकुर नाकारलेला आहे. त्यामुळे सदर गुन्हयाची फिर्याद सिध्द झालेली नाही. त्याचप्रमाणे सा.क्र.२ यांनी देखील अभियोग पक्षास साथ दिलेली नाही. सदर सा.क्र.१ हिने तिच्या मानसिक व छाळाबद्दल कोणतेही वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द सदरचा आरोप सिध्द झालेला नाही.

१४. एकंदरीत अभिलेखातील पुराव्यांचे विवेचन करता फिर्यादी व साक्षीदार यांच्या पुराव्यामध्ये असे आले नाही की, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीकडुन आरोपी क्र.१ यास मेडीकल सुरु करण्याकरीता रक्कम रुपये ३०,००,०००/- रुपये माहेराहुन आणण्याकरीता तिचा मानिसक व शारिरीक छळ केला. त्याचप्रमाणे तिच्याकडील सोन्याचे दागदागिने स्त्रीधन काढुन घेऊन स्वतःच्या

7.3.2024

फायदयायकरीता अपहार केला. तसेच, तिला मारहाण करुन शिवीगाळ केली. अभिलेखावरील पुराव्याचे विवेचन करता असे दिसून येते की, फिर्यादी ही तीचे फिर्यादीप्रमाणे सांगत नाही. त्यामुळे सदर गुन्ह्याची फिर्याद सिद्ध झालेली नाही. तसेच, सा.क्र.२ यांनी देखील अभियोगपक्षास साथ दिली नाही. तसेच, फिर्यादी हीने तीचे पुराव्यात सांगितले की, तीच्यामध्ये व आरोपीमध्ये तडजोड झालेली आहे. त्यांचा खुला झालेला आहे. सा. क्र.२ यांनी देखील अभियोग पक्षास साथ दिलेली नाही. सदर फिर्यादीकडे आरोपींनी आपसांत संगनमत करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीचा पती या नात्याने व आरोपी क्र.२ व ३ यांनी तीचेकडे तीस लाख रुपये आरोपी क्र .१ यास मेडीकल सुरु करण्यासाठी माहेरवरून आणण्याची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला व तिला क्रुरपणे वागणुक दिली. तसेच, तिला शिवीगाळ व मारहाण केली याबद्दल तिने काहीएक सांगितलेले नाही.सा. क्र. २ यांनी देखील अभियोग पक्षास साथ दिलेली नाही. त्यांनी देखील सांगितले नाही की, आरोपी यांनी फिर्यादीकडे तीस रुपये आरोपी क्र .१ यास मेडीकल सुरु करण्यासाठी माहेरून आणण्याची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. त्याचप्रमाणे तिच्याकडील सोन्याचे दागदागिने स्त्रीधन काढुन घेऊन स्वतःच्या फायदयायकरीता अपहार केला. तिला क्रुरपणे वागणुक दिली. तसेच, तिला शिवीगाळ व मारहाण केली. अभिलेखावर असलेला एकूण पुरावा आरोपींना शासन करण्यास पुरेसा नाही म्हणून मुद्दा क्र.१ ते मुद्दा क्र.४ करीता नकारार्थी

P
7.3.2024

निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता:**

१५. फिर्यादीने सरपासणीमध्ये दिलेले कथन तीचे फिर्यादीमधील कथनाशी विसंगत आहे. परंतु, तिचे व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाल्यामुळे फिर्यादीने अशी भुमिका घेतली. त्यामुळे तीचे विरुध्द खोटा पुरावा दिल्याबाबत कारवाई करणे योग्य वाटत नाही. मुद्दा क्र.६ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी क्र.१ ते ७ यांस फौजदारी प्रक्रीया संहीता चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहीताचे कलम ४९८-अ, ४०६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्त करत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहीता चे कलम ४३७-अ अन्वये रक्कम रुपये ७,०००/- चा प्रत्येकी जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

7.3.2024.

**(श्रीमती.पी.एस.मुळे)**

दि. ०७.०३.२०२४

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१५, औरंगाबाद.